# महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ (१९५१ चा अधिनियम क्र. २२) अन्वये आदेश

ज्याअर्थी, सोलापूर शहर हद्दीत जड वाहतुकीमुळे वाहतुकीस अडथळा होत असल्याची, तसेच या जड वाहतुकीमुळे अनेक प्राणांतिक स्वरूपाचे अपघात होत असल्याची खात्री झाल्याने तत्कालिन पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांनी त्यांना उपरोक्त अधिनियमान्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून दिनांक १३/१०/२०१८ पासून सोलापूर शहराच्या हद्दीमध्ये काही अपवाद वगळता जड वाहतूकीस प्रतिबंध करण्याबाबतचे आदेश पारीत केले होते.

ज्याअर्थी, सदर आदेशांची अंमलबजावणी सध्या सुरू असून, त्यामध्ये सुट दिलेल्या काही जड वाहनांमुळे अलीकडील काळात गंभीर व प्राणांतिक स्वरूपाचे अपघात होवून कायदा व सुव्यवस्थेचे प्रसंग निर्माण झालेले आहेत. तसेच, विविध सामाजिक व राजकिय संघटना, सामान्य नागरीक यांचेकडून सातत्याने सोलापूर शहरातील जड वाहतूकीस प्रतिबंध करण्याची मागणी होत आहे. तसेच, यापुढील काळात अशा प्रकारच्या जड वाहनांच्या शहरातील गर्दीच्या वेळी वाहतूकीमुळे अपघात झाल्यास त्यातून गंभीर स्वरूपाचा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू शकतो अशी माझी खात्री झाली आहे.

आणि ज्या अर्थी, शहरातील जड वाहनांच्या वाहतुकीच्या अनुषंगाने तत्कालीन पोलीस आयुक्त श्री. महादेव तांबडे यांनी दिनांक १३/१०/२०१८ रोजी काढलेला आदेश रद्द करुन, सोलापूर शहरातील नागरिकांच्या सोईसाठी व त्यांचे जिवीतास होणारा धोका, वाहतुकीस होणारा सार्वत्रिक अडथळा आणि जनतेची गैरसोय यास प्रतिबंध होण्यासाठी सोलापूर शहरातील जड वाहनांचे वाहतुकीचे नियमन करण्यासाठी नवीन आदेश काढणे अनिवार्य असल्याची माझी खात्री झाली आहे.

त्या अर्थी, मी, डॉ. राजेंद्र माने, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर मला महाराष्ट्र पोलीस कायदा-१९५१ (१९५१ चा अधिनियम क्र. २२) चे कलम ३३(१)(ब) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून, यापुर्वीचे सोलापूर शहरातील जड वाहतूकीच्या विनियमनाच्या अनुषंगाने अस्तित्वात असलेले सर्व आदेश रद्द करून, खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेशः-

१. सोलापूर शहर पोलीस आयुक्तालय हद्दीत मोटार वाहन अधिनियम १९८८ (१९८८ चा अधिनियम क्र. ५९) मधील कलम २ (१६) मध्ये नमूद असलेली, आणि ज्या वाहनांच्या नोंदणी पत्रावर नोंदणी प्राधिकारी यांनी वाहनांचा प्रकार म्हणून जड वाहतुक वाहन (HGMV) अशी नोंद केली आहे, अशा जड मालवाहू वाहनांना सकाळी ०७:०० वा. ते रात्रौ २१:०० वा. चे कालावधीत सोलापूर शहरात प्रवेश करण्यास व वाहतूक करण्यास बंदी राहील.

२. जड मालवाहू वाहनांना देगांव नाका, नवीन होटगी नाका, नवीन विजापूर नाका, नवीन अक्कलकोट नाका, जुना तुळजापूर नाका, मार्केट यार्ड येथून रात्रौ २१:०० वा. ते सकाळी ०७:०० वा. या कालावधीत सोलापूर शहरात प्रवेश करण्यास व वाहतूक करण्यास परवानगी राहील. सदर कालावधीत सदर वाहनांसाठी कमाल वेग मर्यादा ही जास्तीत जास्त ४० किमी. प्रती तास राहील.

३. जुना पुना नाका ते निराळे वस्ती या मार्गावर जड मालवाहू वाहनांच्या वाहतुकीस पुर्णपणे बंदी राहील.

४. जुना पुना नाका ते शिवाजी चौक मार्गे भैय्या चौक या मार्गावर जड मालवाहु वाहनांच्या वाहतुकीस सकाळी ०६:०० वा. ते रात्रौ २२:०० वा. पर्यंत बंदी राहील.

**उपरोक्त जड मालवाहू वाहनांच्या बंदी आदेशातून खालील प्रकारच्या वाहनांना नमूद अटी व शर्तीवर** शिथीलता राहील.

A) रेल्वे मालधक्का सोलापूर येथून माल घेवून जाणाऱ्या जड मालवाहू वाहनांसाठी वाहतूक बंदी कालावधीत मालधक्का ते मंगळवेढा याच रस्त्याने जाण्यास व येण्यास परवानगी असेल.

B) मालधक्का येथे येणारा धान्यसाठा घेवून जाण्यास वापरात येणारी जड वाहने यांना रामवाडी गोडावून येथून मोदी बोगदा, मसिहा चौक, पत्रकार भवन चौक, महावीर चौक, आसरा चौक, विमानतळ ते एफ.सी.आय. गोडावून, होटगी रोड कारखाना या मार्गाने येण्या-जाणेस परवानगी राहील. सदर वाहनांसाठी पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांची, अथवा त्यांनी अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याची लेखी परवानगी घेणे आवश्यक राहील. तसेच सदरची वाहने सोलापूर शहराच्या हद्दीतून जातांना ताशी २० किमी पेक्षा जास्त वेगाने चालविता येणार नाहीत.

C) उपरोक्त नमूद बंदी आदेश हे रुग्णालयाचे उपयोगासाठी ऑक्सीजन सिलेंडरची वाहतूक करणारी जड मालवाहु वाहने, अग्निशमन दलाची जड वाहने, पोलीस दलाची जड वाहने, सैन्य दलाची जड वाहने, ऊस वाहतुक करणारी वाहने, तसेच सोलापूर महानगर पालिकेची साफ-सफाई व अत्यावश्यक सेवेसाठी लागणारी वाहने या वाहनांना लागू होणार नाहीत. मात्र सदरची वाहने आपत्कालिन कर्तव्यावर असल्याखेरीज ताशी २० किमी पेक्षा जास्त वेगाने चालविता येणार नाहीत.

D) उप प्रादेशिक परिवहन विभाग, सोलापूर (R.T.O.) येथे पासिंग व नुतनीकरणाकरीता येणारी जड वाहने ही केगांव बायपास मार्गाने जुना विजापूर नाका - विजापूर रोड या मार्गाने येण्या-जाण्यास, तसेच अक्कलकोट रोड येथून येणारी जड वाहने ही कुंभारी मार्गे श्री सिद्धेश्वर साखर कारखाना, होटगी नाका, आसरा चौक, जुळा सोलापूर या मार्गाने उप प्रादेशिक परिवहन विभाग, सोलापूर (R.T.O.) येथे येण्यास परवानगी राहील.

E) याव्यतिरीक्त अत्यावश्यक कारणासाठी जड वाहतूक करणाऱ्या वाहनांस परवानगी देण्याचे अधिकार पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांना राहतील.

F) सदर आदेशामध्ये आवश्यक वाटल्यास बदल करण्याचे संपुर्ण अधिकार पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांना राहतील.

सदरचे आदेश हे तात्पुरत्या स्वरुपात निर्गमित करण्यात आले असून, सदरच्या आदेशांच्या अनुषंगाने कोणाची काही हरकत / आक्षेप असल्यास त्याबाबत सदरचे आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून १५ दिवसांत लेखी पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांचे कार्यालयास कळवावे. त्यानंतर प्राप्त हरकती /

आक्षेपांचा विचार करून अंतिम आदेश निर्गमित करण्यात येतील. १५ दिवसांनंतर प्राप्त झालेल्या हरकतींचा / आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.

सदरचे आदेश माझ्या सही व शिक्क्यानिशी दिनांक ३१/०१/२०२३ रोजी पारीत करण्यात आले. सदरचे आदेश दिनांक ०१/०२/२०२३ रोजी पासून अंमलात येतील.

(डॉ. राजेंद्र माने)
पोलीस आयुक्त, सोलापूर शहर.

पोलीस आयुक्त कार्यालय, सोलापूर.

प्रति,
सर्व संबंधीतांना

प्रत :- शासकीय मुद्रणालय, येरवडा पुणे

२/-सदरची अधिसुचना राजपत्रामध्ये प्रसिध्द होवून, १०० प्रती या कार्यालयास पाठविण्याची विनंतीसह

प्रत :- जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, सोलापूर यांना प्रसिध्दी देण्याची विनंतीसह.